**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१२**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-२३/१२/२०११

प्रति,
मा. --------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.१२ मंगळवार दिनांक २७/१२/२०११ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**मंगळवार दिनांक- २७ /१२/२०११ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ६६ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ११ मंगळवार दिनांक १३/१२/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ६७ | अहमदनगर महानगरपालिकेच्या नगर-मनमाड रोड येथील जकात नाक्याकरिता श्री. बाबासाहेब मारूती बोरकर यांची मौजे नागापुर स.नं. ६०/१ ब १ येथील खुली जागा दरमहा भाडे रूपये ६१,२००/- व सदरचे रकमेमध्ये १५% कपात अथवा वाढ करून आकरा महिन्याकरिता भाडे कराराने घेणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ६८ | अहमदनगर महानगरपालिकेचे मोरचुदनगर सर्व्हे नं.२ पैकी अमरधाम भिंती लगतची १०X१० फुट या मापाची जागा अर्जदार श्री. सुर्यकांत लक्ष्मण बोरूडे यांना नियमानुसार अनमात रक्कम व दरमहा भाडे रूपये ३००/- घेउन एक वर्षाच्या भाडे कराराने देणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ६९ | अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरत्या दवाखान्याकरिता डॉ. श्री. सुरेश विलास घोलप यांची तात्पुरत्या स्वरूपात वैदयकीय अधिकारी या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार मानधनावर दिनांक २०/१२/२०११ पासून सहा महिन्याकरिता नेमणूक देणेस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्र. ६६ - मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ११ मंगळवार दिनांक १३/१२/२०११ रोजीच्या सभेच्या इतिवृत्ताची प्रत

२] विषय-क्रमांक- ६७ ते ६९च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- १२**

विषय क्रमांक- ६६ मंगळवार दिनांक २७/१२/२०११

ठराव क्रमांक- ६६ मंगळवार दिनांक २७/१२/२०११

**प्रस्तावाचा विषयः-**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-११ मंगळवार दिनांक १३/१२/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूरः-**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-११ मंगळवार दिनांक १३/१२/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :-मागील सभा दिनांक १३/१२/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :-मागील सभा दिनांक १३/१२/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सौ. गंधे सु. मो. :- मागील सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :-मा.स्थायी समिती सभा क्र. ११ मंगळवार दिनांक १३/१२/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-११ मंगळवार दिनांक १३/१२/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :- मा. सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१२**

विषय क्रमांक- ६७ मंगळवार दिनांक २७/१२/२०११

ठराव क्रमांक- ६७ मंगळवार दिनांक २७/१२/२०११

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेच्या नगर-मनमाड रोड येथील जकात नाक्याकरिता श्री.बाबासाहेब मारूती बोरकर यांची मौजे नागापुर स.नं. ६०/१ब १ येथील खुली जागा दरमहा भाडे रूपये ६१,२००/- व सदरचे रकमेमध्ये १५% कपात अथवा वाढ करून आकरा महिन्याकरिता भाडे कराराने घेणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर :-** जकात विभाग जा.क्र. १२१ दिनांक ४/१२/२०११

विषय- अ.नगर महानगरपालिकेच्या मनमाड रोड येथील जकात नाक्याकरीता भाडे तत्वावर खाजगी खुली जागा कराराने घेण्याबाबत.

सविनय सादर,

विनंती पुर्वक रिपोर्ट देण्यांत येतो की, अर्जदार- श्री. पटेल मित्तल व इतर यांनी नगर-मनमाड रोड येथील जकात नाक्याकरीता अहमदनगर महानगरपालिकेस भाडे तत्वावर दिलेल्या खुल्या जागेची त्यांना आवश्यकता असल्याने उक्त जागा रिकामी करून ताब्यात मिळावी अशाबाबत इकडील कार्यालयाकडेस लेखी अर्ज दिलेले आहेत.

अहमदनगर महानगरपालिकेने मा.स्थायी समिती ठराव क्र. ५ दि.२६/०६/२००७ अन्वये नगर-मनमाड रोड येथील नाक्याकरीता श्री. मित्तल पटेल, डाह्याभाई पटेल व इतर यांची खाजगी खुली जागा द.म. भाडे रू.४०,०००/- नुसार भाडे कराराने घेतलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेस नगर-मनमाड रोड येथील जकात नाक्याकरीता उक्त जागेची आवश्यकता असुन जकात नाक्याकरीता इतरत्र दुसरी पर्यायी जागा उपलब्ध होईपर्यंत सदरची जागा रिकामी करून संबंधीतांच्या ताब्यात देता येणार नसल्याने नगर-मनमाड रोड येथील जकात नाक्याकरीता सदर परिसरामध्ये पर्यायाी जागा शोधण्याबाबत कार्यालयीन आदेशानुसार सदर जकात नाक्यालगतचे परिसरामध्ये प्रत्यक्ष पहाणी व विचारणा केली असता, श्री. बाबासाहेब मारूतीराव बोरकर यांनी त्यांचे मालकीची नगर मनमाड रोड, मौजे नागापुर स.नं. ६०/१ब १ येथील खुली जागा अहमदनगर महानगरपालिकेस जकात नाक्याकरीता द.म.भाडे रू.७५,०००/- नुसार ११ महिन्याचे कराराने देण्याविषयी संमती दर्शविलेली आहे.व त्यानुसार श्री. बोरकर बाबासाहेब मारूतीराव यांचेकडून सदर जागेबाबतचे मोजणी नकाशा व ७/१२ उतारा आदी कागदपत्रे प्राप्त करून घेण्यात आलेली आहेत. (सोबत- मोजणी नकाशा, व ७/१२ उतारा जोडला आहे.)

उक्त जागेकरीता नगररचना विभागामार्फत द.म. भाडे रक्कम रू.६१,२००/- देणे उचित असुन सदर भाडे रक्कमेमध्ये महानगरपालिका १५% कपात अथवा वाढ करून निर्णय घेणे संयुक्तीक होईल अशाबाबत कळविले असल्याने त्यानुसार सदर जागा भाडे तत्वावर कराराने घ्यावयाची झाल्यास द.म. भाडे दराबाबत वरीलप्रमाणे उचित निर्णय मा.स्थायी समिती पुढे घेण्यास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे जकात अधिक्षक यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे जकात नाक्या करिता नगर-मनमाड रोड येथील श्री. बाबासाहेब मारूती बोरकर यांची नागापुर सर्व्हे नं.६०/१ ब १ मधील खुली जागा भाडे कराराने घेणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- सदर जागेचे नगररचना विभागाने ठरविलेले भाडयामध्ये किती टक्के वाढ करावा.

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- नगर-मनमाड रोड येथील जकात नाक्याकरिता म.न.पा.ने घेतलेली जागा मालक यांना आवश्यकता असलेने त्यांनी जागा रिकामी करून ताब्यात मिळणेबाबत मागणी केली आहे मनमाड रोड येथील जकात नाक्याकरिता भाडेकराराने घ्यावयाच्या श्री. बोरकर यांचे जागेचे नगर रचनाकार यांनी रूपये ६१,२००/-दरमहा भाडे व त्यामध्ये १५% टक्के वाढ करून अथवा कपात करून घेणे बाबत प्रस्ताव आहे. जागा मालक यांनी दरमहा रू.७५,०००/- प्रमाणे ११ महिन्याचे कराराने देणे विषयी संम्मती दर्शविलेली आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- रूपये ७० हजार दरमहा या प्रमाणे भाडे कराराने जकात नाक्या करिता जागा घेणेस मंजूरी देण्यात यावी.

मा.सौ. गंधे सु. मो. :- दरमहा रूपये ७० हजार फक्त दरमहा याप्रमाणे जागा घेणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या नगर-मनमाड रोड येथील जकात नाक्याकरिता श्री. बोरकर यांची नागापुर सर्व्हे नं. ६०/ १ ब १ येथील खुली जागा दरमहा रूपये ७० हजार प्रमाणे भाडे कराराने घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठरावः-</u>**अहमदनगर महानगरपालिकेच्या नगर-मनमाड रोड येथील जकात नाक्याकरिता श्री. बाबासाहेब मारूती बोरकर यांची मौजे नागापुर स.नं. ६०/१ब १ येथील खुली जागा दरमहा भाडे रूपये ७०,०००/- (रूपये सत्तर हजार फक्त) प्रमाणे अकरा महिन्याकरिता भाडे कराराने घेण्यास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१२**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक- ६८ | मंगळवार दिनांक २७/१२/२०११ |
| ठराव क्रमांक- ६८ | मंगळवार दिनांक २७/१२/२०११ |

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे मोरचुदनगर सर्व्हे नं.२ पैकी अमरधाम भिंती लगतची १०X१० फुट या मापाची जागा अर्जदार श्री.सुर्यकांत लक्ष्मण बोरूडे यांना नियमानुसार अनमात रक्कम व दरमहा भाडे रूपये ३००/- घेउन एक वर्षाच्या भाडे कराराने देणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा मार्केट विभाग जा.क्र. १८३ दिनांक १५/१२/२०११

प्रस्तावना- विषय- मोरचुद नगर सर्व्हे नं. २ पैकी, अमरधाम भिंतीलगत दक्षिण बाजुस १०X१० फुट या मापाची जागा भाडे तत्वावर मिळणेबाबत.

वरील विषयांस अनुसरून विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, मोरचुदनगर स.नं. २/२ पैकी हे सीनालगत असुन नदीकाठी गाळपेर आहे. ती गाळपेर माझे वडील व त्यानंतर आज अखेर निरंतर माझे नावे व वहीवाटेत आहेत. या गाळपेर क्षेत्रात मी आजअखेर पीक घेत आलेलो आहे. या गाळपेरवर माझा उदरनिर्वाह चालत आहे. परंतु महापौर साहेब व अतिक्रमण विभागाने ही जागा सिटीबस थांबण्यासाठी मागणी केलेली होती. तरी, मी कोणतेही आडेवेडे न घेता. ती जागा सिटीबस थांबण्यासाठी दिली. तरी, माझा उदरनिर्वाह चालावा यासाठी गाळपेर जमिनीचे पूर्वेस अमरधामची भिंत आहे. त्या भिंतीलगत म.न.पाचे गाळे आहे. दक्षिणेकडील गाळयाला लागुन १०X१० या आकाराचे जागा मला भाडे तत्वावर मिळावी. तसेच महापालिका जे भाडे आकारेल व जे नियम ते मला मान्य राहतील असा दि. २७/०७/२०११ चा श्री. सुर्यकांत लक्ष्मण बोरूडे यांचा अर्ज मार्केट विभागाकडे प्राप्त झालेला आहे.

सदर प्रकरणी मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय मागविला असता त्यांनी सदरची जागा रू.३००/- प्रतीमहा भाडे घेवुन १ वर्षाच्या कालावधीकरीता देणे योग्य होईल असा अभिप्राय दिलेला आहे. यास्तव अर्जदार यांचेकडून नियमानुसार अनामत रक्कम घेवुन योग्य तो करारनामा करून घेणे संयुक्तीक होईल तथापि मा.स्थायी समितीने निर्णय घेणेस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अमरधाम भिंती लगत १०X१० फूट या मोजमापाची जागा नियमानुसार अनामत रक्कम घेउन दरमहा भाडे कराराने देणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- महानगरपालिकेने तीन वर्षाच्या भाडे कराराने मोकळया जागा दिलेल्या आहेत त्याप्रमाणे अर्जदार यांना तीन वर्षाकरिता भाडे कराराने जागा देण्यात यावी.

मा.उपायुक्त (सा.)डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- एक वर्षाच्या भाडे कराराने जागा देणे बाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- पूर्वी तीन वर्षाचे भाडे कराराने मोकळया जागा दिलेल्या आहेत.

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- मार्केट विभाग प्रमुख यांनी तीन वर्षाच्या भाडे कराराने जागा देता येईल किंवा कसे सांगावे.

मार्केटविभागप्रमुख (प्र.)श्री.ए.पी.दुर्गे:- मोकळी जागा मा.स्थायी समितीच्या मंजूरीने तीन वर्षाचे भाडे कराराने नियमानुसार देता येईल.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- तीन वर्षाचे भाडे कराराने जागा देण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सौ. गंधे सु.मो. :- तीन वर्षाचे भाडे कराराने जागा देण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- अमरधाम भिंती लगतची १०X१० फूट या मोजमापाची जागा अर्जदार यांना दरमहा भाडे रूपये ३००/- व नियमानुसार अनामत घेउन तीन वर्षाचे भाडे कराराने देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

<u>**ठरावः-**</u> अहमदनगर महानगरपालिकेचे मोरचुदनगर सर्व्हे नं.२ पैकी अमरधाम भिंती लगत दक्षिण बाजूची १०X१० फुट या मापाची जागा अर्जदार श्री.सुर्यकांत लक्ष्मण बोरूडे यांना नियमानुसार अनमात रक्कम घेउन्न दरमहा भाडे रूपये ३००/- (रूपये तीनशे फक्त) या प्रमाणे तीन वर्षाकरिता अटी व शर्ती नुसार भाडे तत्वावर कराराने देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१२**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक- ६९ | मंगळवार दिनांक २७/१२/२०११ |
| ठराव क्रमांक- ६९ | मंगळवार दिनांक २७/१२/२०११ |

**प्रस्तावाचा विषयः-**अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरत्या दवाखान्याकरिता डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार मानधनावर दिनांक २०/१२/२०११ पासून सहा महिन्याकरिता नेमणूक देणेस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा आस्थापना विभाग जा.क्र.वर्क ९७ दि.२३/१२/२०११

विषय- फिरता दवाखान्या करीता डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार मानधनावर करार बध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

सादर,

कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह (फिरता दवाखाना ) जा.क्र. १२९ दिनांक २२/११/२०११ अन्वये प्रस्ताव सादर करून "अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने अहमदनगर शहरामध्ये फिरता दवाखाना सुरू करण्यांत आलेला आहे. सदर फिरता दवाखान्यामुळे दारिद्रय रेषे खालील व गलीच्छ वस्तीत जाउन आरोग्या बाबत जनजागृती व नागरिकांना आरोग्य सेवा पुरविली जाते. सदरच्या फिरता दवाखान्या करीता डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची जा.नं. आस्था./कंत्राटी करार नेमणूक ७३० दिनांक १६/६/२०११ अन्वये सहा महिन्याकरीता वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी करार पध्दतीने नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर आदेशाची मुदत दिनांक १७/१२/२०११ रोजी संपुष्टात येत आहे. त्यांनी आतापर्यत केलेल्या कामाचा तपशिल सोबत जोडून दिलेला आहे. अहमदनगर महानगरपालिकेत वैद्यकीय अधिका-याची संख्या अपुरी पडत आहे. त्यामुळे फिरता दवाखान्याकरीता वैद्यकीय अधिका-याची आवश्यकता आहे. वरील कालावधीत व या आधी दिलेल्या नेमणुकीच्या कालावधीत डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांचे काम समाधानकारक आहे. त्यांना नियमाप्रमाणे पुर्नेनेमणुक देणेस हरकत नाही." असे नमुद करून सुचित केलेले आहे.

तरी कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह (फिरता दवाखाना ) जा.क्र. १२९ दिनांक२२/११/२०११च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्य फिरत्या दवाखान्या करिता डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची जा.क्र. आस्था./ कंत्राटी करार नेमणुक २७०८ दिनांक १९/१२/२०११ अन्वये तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर नेमणूक आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार दरमहा रूपये १०,०००/- (अक्षरी रूपये दहा हजार मात्र) या मानधनावर दिनांक २०/१२/२०११ पासुन सहा महिन्याकरीता केलेल्या करार बध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये ं वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये ं झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेच्या फिरत्या दवाखान्याकरिता डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची वैद्यकीय अधिकारी या पदावर सहा महिन्याकरिता मानधनावर नेमणूक देणेस कार्योत्तर मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मानधन वाढवून देणे विषयी प्रस्ताव आहे का ?

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री.डोईफोडे साहेब :- दिनांक २०/१२/२०११ पासून सहा महिन्याकरिता दिलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरत्या दवाखान्याकरिता डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार दरमहा रूपये १०,०००/- (अक्षरी रूपये दहा हजार मात्र) या मानधनावर दिनांक २०/१२/२०११ पासून सहा महिन्याकरिता नेमणूक देणेस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका